# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. ४४२/२०२१/नंदुरबार**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. सुभाष एन. पाटील,<br>रा.फ्टॅट नं.११, प्रियंका अपार्टमेंट (ब), वावरेनगर, आयटीआय, अंबड लिंक रोड, कामटवाडा शिवार, नाशिक, ता.जि.नाशिक. | शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार, ता.जि.नंदुरबार. | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार, ता.जि.नंदुरबार. |

**सुनावणी दिनांक – ०२/०२/२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १९/११/२०२०

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती दिली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १७/०३/२०२०

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन-२०१८ ते २०१९

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** आपल्या विभागीय कार्यालयात कार्यरत कार्यकारी अभियंता यांच्या कार्यकाळात झालेल्या सर्व रस्ते, पुल, इमारतीच्या कामांचे काढलेल्या बिला संबंधी विभागीय कार्यालयातील कॅश बुकच्या प्रत्येक पाननिहाय सत्य छायांकित प्रति द्याव्या.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रथम लिपिक सार्वजनिक बांधकाम विभाग नंदुरबार, यांनी दि.२६/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये एकूण रुपये ४७५/- एवढे माहिती शुल्क कळविले आहे.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २५/०५/२०२०

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २६/०५/२०२०

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी सादर केलेला प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नंदुरबार, यांनी दि.०३/११/२०२० रोजी सुनावणी घेऊर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती अर्जानुसार कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसाच्या आत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य पुरविण्याचे आदेशीत करुन प्रथम अपिल निकाली काढण्यात आले.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा –**

(१) **अपिलार्थी-** कॅशबुकच्या बिलाच्या प्रति मागितल्या होत्या परंतु कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही.

(२) **तत्कालीन जन माहिती अधिकारी-** अपिलार्थी यांना दि.२६/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये एकूण रुपये ४७५/- एवढे माहिती शुल्क कळविले असल्याचे स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष –**

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती शुल्क भरणा करण्याबाबत कळविले मात्र त्यांनी माहिती शुल्क भरलेले नाही. तसेच दाखल केलेल्या द्वितीय अपिल अर्जात महिती शुल्काचा मुद्दा उपस्थित केलेला नाही.

(२) तसेच अपिलार्थी यांचा माहिती अर्जात माहितीचा विशीष्ट दिनांक नमुद नसल्याने सदर माहिती अर्ज मोघम होत आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ३/१-३३९४ 30 OCT 2024